वर्ष-०८ अंक-०४ मुंबई, मंगळवार १४ ते २० डिसेंबर २०२१ पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 ठाण्यात डिजीटल बोर्ड घोटाळा
3 → एकट्या महिलेला मदतीचा दिलासा
कैद्यांची मानसिकता बदलण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आवश्यक ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## अजनीत सलूनमध्ये सुरू होता देहव्यापार, पोलिसांनी कसा टाकला छापा?




नागपूर : अजनीतील एका सलूनमध्ये मसाज तरुणींकडून करून घेतले जात होते. त्यामुळं या सलूनच्या ग्राहकांमध्ये वाढ झाली. त्यानंतर तिथं देहव्यापारही सुरू झाला. ही माहिती मिळताच पोलिसांनी छापा टाकला. यात दोन तरुणींची सुटका करण्यात आली. आरोपी रवी चौधरी याला अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या पोलीस निरीक्षक कविता इसारकर यांना गुप्त माहिती मिळाली होती की, बजाजनगर पोलिस ठाणे हद्दीत सलूनच्या नावानं देहव्यापार सुरू आहे. रवी चौधरी हा अजनी चौकातील भवानी चेंम्बरमध्ये रेडीफाईन द प्रोफेशन फॅमिली सलून येथे आर्थिक फायद्याकरिता..पान २ वर...

## सचिन वाझेबद्दल मुंबई पोलिसांचा धक्कादायक खुलासा, म्हणाले, तो धमकी द्यायचा की



मुंबई गुन्हे शाखेने दाखल केलेल्या १,८९५ पानांच्या आरोपपत्रात बडतर्फ सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) सचिन वाझे यांनी आपल्या कनिष्ठांना खंडणीसाठी भाग पाडण्यासाठी नोकरी घालवण्याच्या आणि बदलीच्या धमक्या दिल्या. पोलीस अधिकारी आणि हवालदारांच्या विधानानुसार, वाझे यांनी तत्कालीन शहर पोलीस प्रमुख परमबीर सिंग यांच्याशी संपर्क साधून बार मालक, बुकी आणि इतर अवैध व्यवसायांची माहिती मिळवली. कार्यरत पोलीस अधिकारी आणि हवालदारांच्या जबाबानुसार, वाझे यांना मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त (CP) परमबीर सिंग यांचे संरक्षण होते. सध्या क्राइम ब्रँचशी निगडीत असलेल्या एका पोलीस हवालदाराने आपल्या निवेदनात, वाझेने त्याला बार आणि इतर अवैध धंद्यांची माहिती गोळा करण्यास भाग पाडल्याचे नमूद केले आहे. "जून २०२० मध्ये जेव्हा वाझे पुन्हा कामावर आले तेव्हा लॉकडाऊन कालावधीत शहरातील बार आणि इतर बेकायदेशीर व्यवसायांचे तपशील गोळा करण्यास सुरुवात केली." याबद्दल टाइम्स नाऊने दिलेल्या वृत्तानुसार, वाझे यांनी सिंग यांनी त्यांना दिलेल्या अधिकारांचा आणि बळाचा वापर केला आणि मुंबई क्राइम ब्रँचच्या क्राईम इंटेलिजन्स युनिट (CIU) च्या सर्व संसाधनांचा वापर करून ते हाताळत असलेल्या बहुतांश हायप्रोफाईल प्रकरणांमधून पैसे उकळले. "डिसेंबर २०२० मध्ये, बार ...पान २ वर...

## वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे अल्पवयीन मोलकरणीला अभिनेत्रीची मारहाण

**पोलिसांनी केली अटक**

**या आधीही अभिनेत्रीने तिच्यावर अत्याचार केला होता आणि नंतर तिचे कपडे काढले होते असा आरोप मुलीने केला**



मुंबई पोलिसांनी एका २५ वर्षीय अभिनेत्रीला अटक केली आहे. अभिनेत्रीवर अल्पवयीन मोलकरणीवर अत्याचार केल्याचा आरोप आहे. मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिनेत्रीने अल्पवयीन मुलीला सँडलने मारहाण केली आहे. त्याचवेळी, मोलकरणीला काम करण्यास उशीर झाल्याने अभिनेत्रीने हे कृत्य केल्याचे सांगितले जात आहे. याप्रकरणी अभिनेत्रीला अटक करण्यात आली असून चौकशी ...पान २ वर...

## लग्न समारंभामध्ये चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला काशिमीरा पोलिसांनी केले गजाआड

मिरा भाईंदर : काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत व इतर सर्व ठिकाणी चालु असलेल्या लग्नसराईमध्ये हॉलमधील लग्न समारंभातुन सोन्या- चांदीचे दागिने, मोबाईल फोन तसेच रोख रक्कम चोरी झाल्याबाबत गुन्हे दाखल झाले होते. नमुद गुन्हयातील आरोपीचा शोध काशिमीरा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे, अधिकारी व अंमलदार घेत होते. घटनास्थळावरुन मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे व गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे काशिमीरा पोलिसांनी १)बाबु लखपत सिसोदीया वय - २१ वर्षे,२) आतीश अमर सिसोदीया, वय - २३ वर्षे,३) निखील रवी सिसोदीया, वय - १९ वर्षे,४) विधीसंघर्षग्रस्त बालक व ५) करण महवीर सिंग, वय - २३ वर्षे, यांना अटक करण्यात आली आहे. आरोपी यांना दिनांक ०६/१२/२०२१..पान २ वर...



## दुसऱ्याच्या भांडणात लहान भावाची मध्यस्थी मोठ्या भावाच्या जिवावर बेतली, तरुण गंभीर जखमी



कल्याण : लहान भावाने भांडणात मध्यस्थी केली याचा राग मनात ठेवून काही तरुणांनी मोठ्या भावावर हल्ला केल्याची घटना कल्याणमध्ये घडली आहे. जखमी तरुणावर रुग्णलयात उपचार सुरु आहेत. पोलिसांनी या प्रकरणी दोन जणांना अटक केली आहे. विशाल भालेराव असे जखमी तरुणाचे नाव आहे. तर प्रतिक ठाकरे आणि विकास शिंदे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

भांडणात मध्यस्थी केल्याच्या रागातून हल्ला कल्याणच्या आधारवाडी परिसरात राहणारे काही तरुण एका ढाब्यावर बसले होते. या दरम्यान विजय शिंदे आणि त्याचा मित्राचा बंटी नावाच्या एका तरुणासोबत काही कारणावरुन वाद झाला. वाद सुरु असताना या ठिकाणी असलेल्या अक्षय भालेराव या तरुणाने मध्यस्थी करीत भांडण सोडविले. दोन्ही गटांना घरी जाण्यास सांगितले. या गोष्टीचा राग मनात धरुन विजय शिंदे, विकास शिंदे, हर्षद पाटील, प्रतिक ठाकरे आणि एक बोरगावकर नावाचा तरुण पुन्हा अक्षयच्या शोधात आले.

दुसऱ्या दिवशी अक्षयला एका ठिकाणी भेटले.

समजूत काढण्यास गेलेल्या मोठ्या भावावर चाकूने वार विजय शिंदे यांने अक्षयला भांडणात मध्यस्थी केल्याबद्दल जाब विचारला. जास्त शहाणपणा करीत होता. आता कोणाला बोलवायचे ते बोलव. आम्ही तुला सोडणार नाही, असे बोलत सर्वांनी अक्षयला घेरले. अक्षयने लगेच त्याचा मोठा भाऊ विशाल याला फोन केला. विशाल त्याठिकाणी आला. विशालने सगळ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्याचा प्रयत्न यशस्वी ठरला. गुन्हेगार प्रवृत्तीचा असलेला विजय शिंदे आणि त्याच्या मित्रंनी विशालवर चाकूने सपासप वार करण्यास सुरुवात केली.

## अंधेरीत डान्स बारवर मुंबई पोलिसांचा छापा

मुंबई : अंधेरीतील दीपा डान्स बारवर छापा टाकून पोलिसांनी 17 मुलींची सुटका केली. मुंबई पोलिसांच्या समाजसेवा शाखेने ही कारवाई केली. याप्रकरणी बारच्या मॅनेजर आणि कॅशियरसह तीन कर्मचाऱ्यांविरोधात अंधेरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका एनजीओच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. यादरम्यान स्थानिक पोलीस ठाण्याच्या पोलिसांना या छाप्याची माहितीही नव्हती.



**तळघरातून 17 मुलींची सुटका**

**नियमाविरुद्ध सुरु होता बार**

बार गर्ल्सना बारच्या तळघरात ठेवण्यात आले होते. तेथून 17 मुलींना ताब्यात घेण्यात आले आहे. कोरोना काळातही या डान्सबारमध्ये खुलेआम नियमांचे उल्लंघन होत असल्याची तक्रार एका एनजीओच्या वतीने करण्यात आली होती. पोलिसांच्या नियमानुसार बार डान्सर्स बारमध्ये खुलेआम डान्स करतात आणि दररोज शेकडो लोक या बार डान्सर्सवर लाखो रुपये खर्च करायला येतात. हा बार नियमाविरुद्ध रात्रभर सुरु असायचा.

मात्र, स्थानिक अंधेरी पोलिसांना याची माहितीही मिळाली नव्हती. पोलिसांच्या समाजसेवा शाखेचे पथक शनिवारी रात्री 11.30 ते 12.30 च्या सुमारास छापा मारण्यासाठी पोहोचले.

**मेकअप रुममधील आरशाच्या मागे गुप्त रुममधून मुलींना घेतले ताब्यात**

मुंबईत डान्सबारवरील बंदी उठवण्यात आल्यानंतर केवळ चार मुलींनाच काम करण्याची मुभा असली तरी येथे ऑर्केस्ट्राच्या नावाखाली 40..पान २ वर...

## बँकेची ३१ लाखांची फसवणूक करणाऱ्याला अटक

मुंबई : बँकेची सुमारे ३१ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी प्रणवेश मळेकर याला अंधेरी एमआयडीसी पोलिसांनी अटक केली. प्रणवेशने घराच्या कागदपत्रांवर दोन बँकांतून कर्ज काढण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. याच गुन्ह्यांत तो सध्या सोमवारपर्यंत पोलीस कोठडीत आहे. यापूर्वीही त्याला फसवणुकीच्या एका गुन्ह्यात गावदेवी पोलिसांनी अटक केली होती. प्रणवेश हा जोगेश्वरी परिसरात राहतो.काही महिन्यांपूर्वीच त्याच्याविरुद्ध गावदेवी पोलीस ठाण्यात एक फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता.अटकेनंतर त्याला अंधेरीतील महानगर दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला सोमवार १३ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.



## बसची सिमेंट बल्करला धडक, मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर चार गाड्यांचा विचित्र अपघात, तिघांचा मृत्यू

रायगड : प्रवासी बसच्या धडकेत एक्सप्रेस वेवर काम करणाऱ्या तिघा कामगारांना प्राण गमवावे लागल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवर बोरघाट उतरताना हा अपघात झाला. दोघा कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर एकाला उपचारासाठी नेले जात असताना वाटेत त्याने प्राण सोडले.



अपघातात दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. काय आहे प्रकरण? मुंबई-पुणे महामार्गाच्या मध्यभागी कॉंक्रिटीकरण सुरु..पान २ वर...

## कोट्यावधीच्या वक्फ जमीन मोबदला गैरव्यवहार प्रकरण ; न्यायालयाचा आरोपींना दिलासा नाहीच

पुणे- हिंजवडी माण येथील राजीव गांधी इन्फोटेक साठी अधिग्रहण करण्यात आलेल्या जमीनीच्या मोबदला प्रकरणातील गैरव्यवहारातील आरोपी साहिल मुन्ना खान तसेच रेहाना इशराक खान आणि उझेर इशराक खान यांचे अटकपूर्व जामीन अर्ज पुणे येथील सत्र न्यायालयाने फेटाळून लावले आहेत. ट्रस्टी सांगून बळकावली जमीन आरोपींनी सुमारे 9 कोटी 64 लाख रुपये मोबदला मिळणार असलेल्या वक्फ संस्थेचे ट्रस्टी असल्याचे खोटे सांगितले. त्यासाठी पुरावा म्हणून वक्फ मंडळाचे बनावट ना हरकत पत्र सादर केले. या खोट्या माहितीच्या आधारे सुमारे 8 कोटींपेक्षा अधिक रक्कम परस्पर हस्तांतरित केली . याप्रकरणी इम्तियाज शेख तसेच चांद मुलाणी तसेच इतर आठ आरोपींवर गुन्हा दाखल कारण्यात आला आहे. याप्रकरणात साहील मन्ना खान तसेच रेहाना इशराक खान आणि उझेर इशराक खान यांच्यावर आरोपपत्र दाखल झालेले असल्याने , सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळावा असा प्रयत्न करत होते. न्यायालयाने त्याचे म्हणणे फेटाळून लावत सरकारी वकील ॲड. गेहलोत व मूळ फिर्यादी असलेल्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे विशेष वकील ॲड. समीर शेख यांचे म्हणणे मान्य करत आरोपीचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. आरोपपत्र कायद्यातील तरतुदीनुसार मुदतीत दाखल केले गेले असले तरी या प्रकरणाचा तपास सुरूच राहील व सखोल तपास झाला पाहिजे असे देखील न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे. पोलिसांचे कौतुक या फसवणुकीतील सुमारे 90 टक्के पेक्षा जास्त रक्कम बंडगार्डन पोलीस स्टेशनचे तत्कालीन वरिष्ठ निरीक्षक व सध्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त यशवंत गवारी व ...पान २ वर...



## कोव्हिड सेंटरमधून पसार झालेला चोरटा 7 महिन्यांनी गजाआड

डोंबिवली : कोव्हिड सेंटरमधून पसार झालेल्या आरोपीला 7 महिन्यानंतर अटक करण्यास डोंबिवली मानपाडा पोलिसांना यश आले आहे. राजकुमार बिंद असे या आरोपीचं नाव आहे. तो गेल्या काही महिन्यांपासून दादरा नगर हवेलीमध्ये काम करत होता. एका चोरीच्या प्रकरणात राजकुमारला अटक झाली होती. त्यानंतर त्याला कोरोना झाल्याने कोविड सेंटरमध्ये ठेवण्यात आले होते. तेथून तो पसार झाला होता.सात महिन्यांपूर्वी चोरीच्या प्रकरणात राजकुमारला झाली होती अटकडोंबिवली मानपाडा पोलिसांनी मे महिन्यात राजकुमार बिंदला एका चोरीच्या प्रकरणात अटक केली होती. अटक केल्यानंतर त्याची कोविड चाचणी करण्यात आली. या चाचणीत राजकुमारचा रिपोर्ट कोरोना पॉझिटिव्ह आला. राजकुमारला उपचारासाठी कल्याण भिवंडी रोडवर असलेल्या टाटा आमंत्रा कोव्हिड सेंटरमध्ये ठेवण्यात आले होते. राजकुमारवर नजर ठेवण्यासाठी कोव्हिड सेंटरमध्ये मानपाडा पोलीस ठाण्याचे दोन पोलीस कर्मचारी तैनात ठेवण्यात आले होते. मात्र 10 मे रोजी राजकुमार या दोन्ही कर्मचाऱ्यांना चकवा देत संधी साधून पळून गेला होता. या प्रकरणी भिवंडी कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. तसेच यावेळी ड्युटीवर तैनात आलेल्या दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू होती.मोबाईल लोकेशनमुळे आरोपी अटकगेल्या 7 महिन्यांपासून राजकुमार पोलिसांच्या हाती लागत नव्हता. कल्याण डीसीपी सचिन गुंजाळ, एसीपी जे.डी. मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांनी राजकुमारचा शोध घेण्यासाठी एक पथक नेमले. पोलीस ...पान २ वर...



पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार १४ ते २० डिसेंबर २०२१


# ठाण्यात डिजीटल बोर्ड घोटाळा

## 4 हजार 800 चौरस फुटाचे बोर्ड 23 हजार रुपयांच्या दराने लावले



छायाचित्र कार-विनोद दशरथ मेढे

## सामाजिक कार्यकर्त्यांने आयोजित केले घोटाळ्यांचे प्रदर्शन

ठाणे (प्रतिनिधी)- ठाणे महानगर पालिकेच्या वतीने विविध प्रभागांमध्ये लावण्यात आलेल्या डिजीटल फलकांच्या उभारणीमध्ये मोठा घोटाळा झाला असल्याचे सामाजिक कार्यकर्ते अजय जया यांनी उघडकीस आणले आहे. जे बोर्ड अवघ्या 4 हजार 800 रुपये चौरसफुटाने लावण्यात येत असतात. तेच बोर्ड ठामपाने सुमारे 23 हजार रुपये दराने लावले आहेत, अशी माहिती देणारे चित्रप्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते अजय जया यांनी मराठी ग्रंथ संग्रहालयामध्ये आयोजित केले होते.ठाणे महानगर पालिकेच्या वतीने नगरसेवकांच्या सूचनेवरुन विविध प्रभागांमध्ये डिजीटल फलक लावण्यात आलेले आहेत. या फलकांच्या माध्यमातून नगरसेवक स्वत:ची जाहिरात करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या फलकांची आपण माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मिळवून हे प्रदर्शन आयोजित केले असल्याचे अजय जया यांनी सांगितले.

अजय जया यांनी सांगितले की,सबंध ठाणे शहरात सुमारे 50 डिजीटल बोर्ड लावण्यात आलेले आहेत. हे बोर्ड व्हिजन नावाच्या कंपनीने उभारले आहेत. या कंपनीकडून थेट कोटेशन मिळविल्यानंतर प्रत्येक बोर्डामागे 4 हजार 800 रुपयांचा चौरसफुटांमागे दर देण्यात आला होता. मात्र, ठाणे महानगर पालिकेने हे बोर्ड उभारण्यासाठी 23 हजार रुपयांचा दर दिला आहे. त्यामुळे 3 लाख रुपयांत उभारला जाणारा बोर्ड उभारण्यासाठी ठाणे पालिकेने सुमारे 7 लाख रुपये दिले आहेत.

त्याचवेळी ज्येष्ठ नागरिक कट्ट्यांच्या बाबतीतही असाच घोळ घालण्यात आला आहे. 2.50 लाखात उभारल्या जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिक कट्ट्यासाठी ठाणे पालिकेने चक्क 10 लाख रुपये खर्च केले आहेत. तर, नो पार्किंग बोर्डसाठी 4 हजार 300 रुपये खर्च अपेक्षित असतानाही ठामपाने 21 हजार 100 रुपये खर्च केले आहेत. हा सर्व प्रकार माहिती अधिकारामध्ये उघडकीस आल्यामुळे ठाणेकरांना या घोटाळ्याची माहिती व्हावी, यासाठी आपण हे प्रदर्शन भरविले असल्याचे अजय जया यांनी सांगितले. या घोटाळ्यातील दोषींवर कारवाई करुन हा खर्च वसूल करावा; अन्यथा, आपण उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचेही जया यांनी सांगितले.दरम्यान, अजय जया यांनी आयोजित केलेल्या या प्रदर्शनाला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट दिली.

## ठाणे शहरातील काही भागात पाणी पुरवठा बंद राहणार

ठाणे (१३) : ठाणे महानगरपालिकेच्या पिसे उदंचन केंद्रातील जॅकवेलमधील कचरा, गाळ काढण्यासाठी व टेमघर शुध्दीकरण केंद्रामधील तसेच शहरातील विविध ठिकाणी तातडीने देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याकरीता बुधवार दिनांक 15 डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी 9.00 ते गुरुवार दिनांक 16 डिसेंबर, 2021 रोजी सकाळी 9.00 वाजेपर्यंत शटडाऊन घेण्यात येणार आहे. या शटडाऊनमुळे बुधवार दिनांक 15 डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी 9.00 ते रात्री 9.00 वाजेपर्यंत ठाणे शहरातील इंदिरानगर, श्रीनगर, लोकमान्यनगर, रामनगर, डिफेन्स, किसननगर, घोडबंदर रोड, पातलीपाडा, हिरानंदानी इस्टेट, समतानगर, आकृती, सिध्देश्वर, जॉन्सन, ईटरनिटी, ब्रम्हांड, विजयनगरी, गायमुख, बाळकुम, कोलशेत, आझादनगर या भागात पाणी पुरवठा बंद राहील. तसेच बुधवार रात्री 9.00 ते गुरुवार सकाळी 9.00 वाजेपर्यंत ऋतु पार्क, जेल, साकेत, रुस्तमजी, कळवा व मुंब्रा परिसरातील काही भागात पाणी पुरवठा बंद राहणार आहे. या शटडाऊनमुळे पाणी पुरवठा पूर्व पदावर येईपर्यंत पुढील एक ते दोन दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असून, नागरिकांनी पाण्याचा योग्यतो वापर करुन पालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पाणी पुरवठा विभागाने केले आहे.

# माथेरानमध्ये हत्या झालेल्या महिलेची ओळख पटली, चारित्र्याच्या संशयावरुन पतीनेच काढला पत्नीचा काटा

माथेरान : माथेरानमध्ये एका लॉजमध्ये काल झालेल्या महिलेच्या हत्येचा उलगडा करण्यास रायगड पोलिसांना यश आले आहे. महिलेच्या पतीनेच चारित्र्याच्या संशयावरुन तिची हत्या करुन शीर कापल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. पूनम पाल असे या मयत महिलेचे नाव असून ती मुंबईतील गोरेगाव परिसरात राहते.

रविवारी सकाळी लॉजच्या केअरटेकरने महिलेचा मृतदेह पाहिला होता. त्यानंतर माथेरानमध्ये खळबळ माजली होती. मृतदेहाजवळ कोणतीही वस्तू किंवा ओळखपत्र नव्हते. तसेच महिलेची ओळख पटू नये म्हणून मारेकऱ्याने शीर कापून आपल्यासोबत नेले होते. यामुळे सदर महिलेची ओळख पटवणे आणि गुन्हेगाराला पकडणे हे रायगड पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र घटनास्थळापासून काही अंतरावर एका झुडुपात महिलेची बॅग पोलिसांना सापडली. त्यात एका चिठ्ठीवर पत्ता लिहिला होता. त्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत



महिलेची ओळख पटवण्याचं काम सुरु केलं. महिलेच्या पतीला पनवेलमधून अटक माथेरान येथील सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने महिला आणि तिच्यासोबत असलेल्या तरुणाचा फोटोही मिळवण्यात पोलिसांना काल यश आले होते. यावरून, पोलिसांनी मुंबईतील गोरेगाव येथील पोलीस ठाण्यामध्ये चौकशी केली असता पूनम पाल ही महिला गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता असल्याचं निष्पन्न झालं. पुढील तपास केला असता पूनम पाल ही तरुणी नवऱ्याला भेटण्यासाठी गेली असल्याची माहिती मिळाली होती. या अनुषंगाने तपास केला असता माथेरान येथे हत्या करण्यात आलेल्या तरुणीसोबत असलेला तरुण हा तिचा नवरा असल्याचं निष्पन्न झालं होतं. यावरून, पूनम पाल हिच्या नवऱ्याचा शोध घेतला असता त्याला पनवेल येथून ताब्यात घेण्यात आलं आहे. गेल्या सात महिन्यांपूर्वी मे 2021 मध्ये लग्न झालेल्या पूनम पाल हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिची हत्या करण्यात आली असल्याची शक्यता पोलिस सूत्रांकडून वर्तविण्यात येत आहे.दरम्यान, आरोपी पतीकडून पत्नीच्या मृतदेहाचे कापलेले शीर मिळवून ताब्यात घेण्याचा प्रयत्न रायगड पोलीस करत आहे.

## 'एमपीडीए' कारवाईचे आयुक्तांचे अर्धशतक

शहरातील गुंडांवर वचक ठेवण्यासाठी पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी 'एमपीडीए' आणि 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्या'नुसार (मकोका) कारवाईचा धडाका लावला आहे. 'मकोका'पाठोपाठ आयुक्तांनी आता 'एमपीडीए'च्या कारवाईचे अर्धशतक पूर्ण केले आहे. कुख्यात गजा मारणेचा साथीदार रूपेश मारणेवर नुकतीच 'एमपीडीए'ची पन्नासावी कारवाई करण्यात आली. सराईत गुन्हेगार आणि टोळ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिस आयुक्तांनी पहिल्यापासून




जोरदार प्रतिबंधक कारवाई आरंभली आहे. गुन्हेगारी टोळ्यांवर 'मकोका' आणि स्थानिक गुंडांवर 'एमपीडीए'नुसार कारवाई सुरू आहे. पोलिस आयुक्तांनी आतापर्यंत ६४ टोळ्यांवर 'मकोका'ची कारवाई केली आहे. शनिवारी कुख्यात गुंड रूपेश मारणे याच्यावर 'एमपीडीए'ची कारवाई करून त्याला औरंगाबाद कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. कुख्यात गुंड गजानन मारणे याच्या तळोजा कारागृहापासून पुण्यापर्यंत रॅली काढण्याचा मुख्य सूत्रधार रूपेश मारणे (वय ३८, रा. शास्त्रीनगर, कोथरूड) होता. त्याच्याविरुद्ध कोथरूड, वारजे माळवाडी, स्वारगेट, येरवडा, पौड, तळेगाव दाभाडे, समर्थ पोलिस ठाण्याच्या हद्दीत विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले होते. याप्रकरणी कोथरूडचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेंद्र जगताप यांनी 'एमपीडीए'नुसार कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठांकडे दाखल केला होता. या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली.

अनेक टोळ्या आणि गुंडांवर 'मकोका' आणि तडीपारीची कारवाई करून त्यांची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली. मात्र, तेथेही अनेक टोळ्या एकत्र येऊन विविध 'उद्योग' करीत असल्याचे आढळून आले. त्यामुळे टोळ्यांमधील आरोपींना विविध कारागृहांत हलविण्यात आले आहे.

## तरुणीची २१ लाखांची फसवणूक

विवाहस्थळांच्या (मॅट्रिमोनिअल) संकेतस्थळाद्वारे ओळख झालेल्या एका व्यक्तीने कल्याणमधील तरुणीची तब्बल २१ लाखांची फसवणूक केली असून या प्रकरणी खडकपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपीने वेगवेगळ्या नावांनी इतरही महिलांची फसवणूक केली असून त्याविरुद्ध गुन्हे दाखल असल्याची बाबही समोर आली आहे.

पिडीत ३० वर्षांची तरुणी एका नामांकित सॉफ्टवेअर कंपनीमध्ये काम करत असून तिने मॅट्रिमोनिअल संकेतस्थळावर नाव नोंदवले होते. त्याचदरम्यान, तरुणीला व्हॉट्सअपवर एका अनोळखी व्यक्तीचा मेसेज आला. त्यांच्या दोघांमध्ये बोलणेही झाले. मात्र, तरुणीने नंतर त्याच्याकडे दुर्लक्ष केले.

परंतु या व्यक्तीने पुन्हा तरुणीला संपर्क साधत त्याने स्वतःचे नाव युवराज बाळासाहेब भोसले असे सांगितले. त्याने सांगितले की, तो कोल्हापूर येथे राहत असून खूप श्रीमंत आहे. वडील मुंबईमध्ये आयपीएस अधिकारी होते. वडिलांचे निधन झाले असून आई लंडनमध्ये डॉक्टर आहे. बहीण युरोपमध्ये राहत असल्याचे त्याने तिला सांगितले. तसेच या व्यक्तीने तरुणीकडे लग्न करण्याची मागणी केली. तरुणीने लग्नास नकार दिला.

## जन्मदात्याकडून स्वत:च्या अल्पवयीन मुलीवर तीन महिने बलात्कार; बाप-लेकीच्या नात्याला कलंक

झारखंड : बाप-लेकीच्या नात्याला कलंक लावणारी लाजिरवाणी घटना झारखंडमध्ये घडली आहे. जन्मदाता बापच आपल्या अल्पवयीन मुलीवर सतत लैंगिक अत्याचार करत असल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरुन झरिया पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी बलात्कारी पित्याला अटक केली आहे.

मुलीच्या आईने पतीला रंगेहाथ पकडले रविवारी रात्री अल्पवयीन मुलीच्या आईने पतीचे हे घाणेरडे कृत्य स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्याचे सांगितले जात आहे. ही



घटना उघडकीस येताच बलात्कार करणाऱ्याने आई आणि मुलीला गोळ्या घालण्याची धमकी देण्यास सुरुवात केली. मात्र अल्पवयीन मुलीच्या आईने न घाबरता रात्रीच झरिया पोलीस ठाणे गाठून पतीविरुद्ध लेखी तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले. झरिया पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झरिया पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी सांगितले की, एका महिलेने आपल्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची तक्रार केली होती. ज्यामध्ये महिलेने पती आणि अल्पवयीन मुलाच्या वडिलांवर आरोप केले आहेत. पोलीस ठाण्यात तक्रार मिळताच एफआयआर नोंदवून आरोपीला अटक करण्यात आली. ते म्हणाले की, पीडित मुलगी अल्पवयीन असल्याचे सांगण्यात येत आहे. तिची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर आरोपींवर पॉक्सो कायद्यांतर्गत कारवाई केली जाईल. घरातील इतरांना नशेचे पदार्थ देऊन झोपवायचा मुलीच्या आईने पोलिसांना सांगितले की, पती, एक मुलगा आणि मुलगी एकाच खोलीत राहतात. नवरा रोज दुधात अमली पदार्थ मिसळून प्यायला देत असे. आम्ही दूध पिऊन झोपून जायचो. आम्ही फक्त सकाळीच उठायचो, शनिवारी रात्री दूध थोडे कडवट लागले.

## पृष्ठ १ वरुन

### अजनीत सलूनमध्ये सुरु होता देहव्यापार,

मुलींना पैशाचे आमिष दाखवितो. त्यांना देहव्यापारास प्रवृत्त करून सलूनमध्ये ग्राहकांना पुरवतो.रवी चौधरीला अटक देहव्यापाराची शहानिशा करून सापळा रचण्यात आला. या ठिकाणी धाड टाकण्यात आली. येथून दोन पीडित मुलींची सुटका करण्यात आली. या ठिकाणावरून रवी चौधरी (रा. जुनी अजनी) याला पोलिसांनी अटक केली. तो पीडित मुलींना पैशाचे आमिष दाखवून ग्राहकांना बोलावून स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता देह व्यवसाय करण्यास भाग पाडत होता. आरोपीविरुद्ध कलम तीन, चार, पाच, सात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अन्वये बजाजनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कारवाई शहराचे पोलिस आयुक्त (गुन्हे) सुनील फुलारी यांच्या निर्देशान्वये पोलिस उपायुक्त (डिटेक्शन) चिन्मय पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक कविता इसारकर, मंगला हरडे, अनिल अंबाडे, रशिद शेख आदींनी केली.

संबंध ठेवणाऱ्या तरुणींची सलूनमध्ये भरती रवीनं ग्राहकाशी संबंध ठेवणाऱ्या तरुणींची सलूनमध्ये कर्मचारी म्हणून भरती केली. तो मुलींकडून थेट देहव्यवसाय करून घेत होता. रवीच्या सलूनमध्ये सेक्स रॅकेट चालते, अशी माहिती गुन्हे शाखेला मिळाली. पोलिसांनी आपल्या पंटरला या सलूनमध्ये पाठविले. तेथे रवीशी सौदा झाल्यानंतर रवीने दोन मुलींना बाहेर बोलावले. त्यापैकी एका मुलीची निवड करून तिच्यासोबत खोलीत पाठविले. पंटरने इशारा करताच दबा धरून बसलेल्या पोलीस पथकाने या सलूनमध्ये धाड घातली. त्यावेळी पंटर आणि मुलगी एका खोलीत मिळून आले.

### लग्न समारंभामध्ये चोरी

व दिनांक ०९/१२/२०२१ रोजी अटक करुन तसेच एका विधी संघर्षीत बालकास ताब्यात घेवून गुन्हे प्रकटीकरण शाखेने आरोपी यांच्याकडे तपास केला असता त्यांनी काशिमीरा, बांगुरनगर, सहार, इगतपुरी, ओशिवरा व सांताक्रुज पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील गुन्हे केल्याची कबुली दिली असुन नमुद आरोपीनं कडुन गुन्ह्यातील चोरीस गेलेले ३०० ग्रॅम वजनाचे सोन्या चांदीचे दागिने, अँपल , रेडमी, ओप्पो, विवो कंपनी चे ६मोबाईल फोन व ५०,०००/- रोख रक्कम व गुन्ह्यातील वापरलेले वाहन स्विफ्ट कार एकुण २१,०४,१६५/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन एकुण ०८ गुन्हे पोलिसांनी उघडकीस आणलेले आहेत. सदरची कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उपआयुक्त परीमंडळ-०१, श्री. विलास सानप मा. सहाय्यक पोलीस आयुक्त मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली व.पो. नि. श्री संजय हजारे, स. पो. नि. श्री प्रशांत गांगुर्डे, पो. उप. निरी.जावेद मुल्ला, स. फौज.पी. जी. कावरे, पो.ना विश्वनाथ जरग, पो.शि. हनुमंत तेरवे, समीर यादव, सुधीर खोत, अनिल नागरे, पो.शि. सनी सुर्यवंशी यांनी केलेली आहे.

### वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे

सुरू आहे. वर्सोवा पोलिसांनी या अभिनेत्रीला तिच्या मोलकरणीला वेळेवर काम पूर्ण न केल्यामुळे मारहाण केल्याच्या आरोपाखाली अटक केली. एएनआयने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी वर्सोवा येथील रहिवासी असून ती एका फ्लॅटमध्ये एकटीच राहत होती. वृत्तानुसार, पीडितेने पोलिसांना सांगितले की, तिने नीट काम करत नसल्याचा दावा केल्यानंतर तिच्यावर अनेक वेळा मारहाण केली होती. "कामात दिरंगाई केल्याबद्दल एका अल्पवयीन गृहिणीवर हल्ला केल्याबद्दल वर्सोवा पोलिसांनी एका २५ वर्षीय अभिनेत्रीला अटक केली. पीडितेच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी तिला सँडलने मारहाण केली," अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली आहे. ई टाईमच्या वृत्तानुसार, पीडितेने कथितपणे पोलिसांना सांगितले की, तिने तिचे काम योग्य रीतीने केले नाही म्हणून आरोपीने यापूर्वी तिच्यावर हल्ला केला आणि छळ केला. या वेळी, मुलीने तक्रार दाखल केली कारण अभिनेत्रीने कथितपणे तिच्यावर अत्याचार केला आणि नंतर तिचे कपडे काढले, तिने फोटो आणि व्हिडिओ काढले होते. मारहाणीनंतर तिच्या डोक्याला दुखापत झाल्याचे पीडितेने सांगितले आहे, त्यानंतर ती उपचारासाठी रुग्णालयात गेली होती. दरम्यान, पोलिसांनी भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३५४ (ब) आणि ५०४ तसेच आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्यानुसार एफआयआर नोंदवला आहे. मुलीने बहिणीसोबत पोलीस स्थानकात जाऊन तक्रार नोंदवली आहे.

### सचिन वाझेबद्दल मुंबई पोलिसांचा

आणि रेस्टॉरंट्सने थोड्या निर्बंधांसह काम करण्यास सुरुवात केल्यानंतर, वाझेने पैसे गोळा करण्यास सुरुवात केली. तेव्हा हॉटेलवाल्यांनी मला सांगितले होते," पोलीस हवालदार म्हणाला. "तो काही कॉन्स्टेबल आणि खाजगी व्यक्तींचा वापर करून त्याचे संदेश पाठवत होता, माहिती गोळा करत होता आणि त्याचे पैसे फिरवत होता. अशी चर्चा होती की तो परमबीर सिंगच्या खूप जवळचा होता आणि तो लोकांना त्याच्यासाठी काम करण्यास जबरदस्तीने भाग पाडत असे, "असंही या हवालदाराने सांगितलं. कॉन्स्टेबलने सांगितले की, तो १९९० पासून पोलीस दलात आहे आणि मुंबई पोलिसांच्या अधिकारक्षेत्रातील पश्चिम आणि उत्तर भागात त्याच्याकडे माहिती देणाऱ्यांचे चांगले नेटवर्क आहे. "कोणीतरी वाझेला माझ्या नेटवर्कबद्दल माहिती दिली आणि त्याने मला डिसेंबर २०२० मध्ये त्याच्या कार्यालयात बोलावले. त्याने मला शहराच्या उत्तर आणि पश्चिम भागातील अवैध व्यवसायांची माहिती देण्यास सांगितले. मी नकार दिल्यावर वाझे यांनी विचारले की मला विभागात राहायचे आहे का? ते मला म्हणाले, 'एसएस शाखा माझ्या हाताखाली काम करते. मला थेट वरून सूचना मिळतात. आणि मी इतर कोणत्याही अधिकाऱ्याशी बोलत नाही. जर तुम्ही मला मदत केली नाही तर तुम्हाला गंभीर परिणाम भोगावे लागतील. मी त्याला विनंती केली की मला यात ओढू नका, पण त्याने माझी नोकरी काढून घेण्याची धमकी दिली आणि तो सांगेल तसे करायला सांगितले – तो जेव्हा म्हणेल तेव्हा हॉटेलमधून पॅकेट गोळा कर. मी घाबरलो आणि त्याला थोडी मदत केली आणि त्याला शहरातील बार आणि इतर बेकायदेशीर व्यवसायांची माहिती दिली.

### अंधेरीत डान्स बारवर मुंबई पोलिसांचा छापा

हून अधिक मुलींकडून नाचवण्यात येत होते. पोलिसांच्या छाप्याला घाबरून या मुली तळघरातील गुप्त खोलीत लपल्या होत्या. जेव्हा संपूर्ण पोलीस दल आणि एनजीओ बारमध्ये पोहोचले, तेव्हा सर्वजण घाबरले आणि इतक्यात एनजीओच्या टीमचे लोक मेकअप रुममध्ये गेले, तिथे त्यांची नजर भिंतीवर लावलेल्या आरशावर पडली. हा आरसा सामान्य आरशापेक्षा खूप मोठा असल्याने एनजीओच्या लोकांना संशयास्पद वाटले.

एनजीओच्या टीमने हा आरसा हटवला असता आरशाच्या मागे असलेली गुप्त खोली पोलिसांना दिसली. या खोलीत जाऊन पाहिले असता 17 बार बाला येथे लपून बसल्या होत्या. या सर्व बार बालांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुप्त तळघरात एसी, बेड अशा सर्व सुविधा होत्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले(

### बसची सिमेंट बल्करला धडक,

असताना प्रवासी बसने सिमेंट बल्कर आणि त्या ठिकाणी काम करणाऱ्या काही कामगारांना धडक दिली. तर आणखी एका वाहनाने बसला धडक दिली. अशा प्रकारे एकूण चार वाहनांचा विचित्र अपघात झाला.

### कोट्यावधीच्या वक्फ जमीन

त्यांच्या टीममधील अधिकारी व पोलिसांनी आतापर्यंत वसुल केली आहे. वसूल केलेली रक्कम बँकेत जमा केली आहे. पोलिसांनी केलेल्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. हे फार मोठे आणि विस्तीर्ण स्वरूपाचे प्रकरण असल्याने सक्तवसुली संचानालय देखील यावर लक्ष ठेवून आहे. या प्रकरणातील प्रमुख संशयित आरोपी ईशराक अब्दुलगनी खान याला पुणे येथील न्यायालयाने या पूर्वीच फरार घोषीत केले आहे.

### कोव्हिड सेंटरमधून पसार झालेला

अधिकारी अविनाश वणवे यांच्या टीमला ही जबाबदारी सोपवण्यात आली. उत्तर प्रदेशच्या मिरजापूर येथील राहणारा राजकुमार याचा मोबाईल लोकेशन पोलिसांनी ट्रॅक करण्याचे काम सुरू केलं. वारंवार त्याचं लोकेशन बदलत होते. अखेर 10 सप्टेंबर रोजी राजकुमार याचा फोन दादरा हवेली सिल्वासा येथे ट्रेस झाला. पोलिसांचे पथक त्या ठिकाणी पोहचले. राजकुमार हा एका कंपनीत काम करत होता. अखेर त्याला अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.



## संपादकीय...

# स्त्रीवादी पुरुष

भारतात गतसप्ताह संरक्षणदल प्रमुख जनरल बिपिन रावत यांच्या आकस्मिक निधनाने झाकोळलेला होता. त्यामुळे त्याच दिवशी जर्मनीत झालेल्या एका महत्त्वाच्या घडामोडीकडे आपले दुर्लक्ष झाले. ती म्हणजे चॅन्सेलर अँगेला मर्केल पायउतार होणे आणि त्या पदी ओलाफ शोल्झ विराजमान होणे. वास्तविक जर्मनीत सार्वत्रिक निवडणुका सप्टेंबरातच झालेल्या. पण कोणत्याही एका पक्षास निर्णायक मते न मिळाल्याने तेव्हापासून आघाडी सरकारसाठी जुळवाजुळव सुरू होती. ती अखेर फळास आली आणि सोशल डेमॉक्रॅट पक्षाचे ओलाफ शोल्झ यांच्या नेतृत्वाखालील आघाडीने आवश्यक ते बहुमत जमा केले. अँगेला मर्केल या ख्रिश्चन डेमॉक्रॅट पक्षाच्या. त्यांच्या पक्षाचा या निवडणुकीत पराभव झाला. जवळपास दीड दशकांहून अधिक काळ सत्ता या पक्षाच्या आणि त्यानिमित्ताने मर्केलबाईंच्या हाती होती. इतक्या प्रदीर्घ काळानंतर मतदारांस जरा थारेपालट करावा असे वाटले असेल तर ते साहजिक म्हणायला हवे. ही निवडणूक आपण लढणार नाही, असे मर्केलबाईंनी आधीच जाहीर केले होते. त्यानुसार त्या लढल्या नाहीत आणि त्यांच्या पक्षास आवश्यक ते बहुमत न मिळाल्याने त्या देशातील प्रथेनुसार काळजीवाहू चॅन्सेलरपद त्या सांभाळत राहिल्या. शोल्झ यांच्या आघाडीप्रमुखाने ते संपुष्टात आले. मर्केलबाई आणखी दहा दिवस पदावर राहत्या तर सलग इतकी वर्षे जर्मनीच्या सत्तापदी राहण्याचा विक्रम त्यांच्या नावी नोंदला जाता. या विक्रमासाठी लांड्यालबाड्या करून त्यांचे चॅन्सेलरपद दहा दिवसांनी लांबवण्याची क्लृप्ती त्यांना वा त्यांच्या पक्षास सुचली नसावी. यावरून त्यांचा भारताचा पुरेसा अभ्यास नसावा असे मानण्यास जागा आहे. असो. अशा तऱ्हेने त्यांचा कालखंड संपला.

जर्मनीचे आर्थिक यश हे त्या देशातील आघाडीच्या राजकारणात आहे, हा महत्त्वाचा मुद्दा यानिमित्ताने लक्षात घ्यायला हवा. पंधराहून अधिक वर्षे मर्केलबाईंहाती सत्ता होती. पण तरीही त्या अजेय झाल्या नाहीत वा आवरेनाशा झाल्या आहेत असे झाले नाही. याचे कारण त्यांच्या पक्षास अन्य पक्षांच्या बरोबरीने पुढेमागे करून सत्ता राबवावी लागली. एकमेवाद्वितीय, महान नेता वगैरे असे काही त्यांचे झाले नाही. 'प्रगतीसाठी स्थिर सरकार हवे' वगैरे बावळट समजांवर जर्मन नागरिक विश्वास ठेवत नाहीत हे त्या देशाच्या लोकशाहीचे प्रौढत्व. त्यामुळे एकालाच दांडगे बहुमत मिळाले की जी मनमानी करता येते ती करण्याची सवय जर्मनीच्या सुदैवाने मर्केलबाईंमध्ये नव्हती आणि शोल्झ यांनाही ती नसेल. मुक्त लोकशाहीवादी आणि पर्यावरणवादी या दोन पक्षांच्या सहकार्याने शोल्झ यांना सत्ता राबवावी लागेल. यातील मुक्त लोकशाहीवादी याआधी साठच्या दशकात विली ब्रँट आणि नंतर हेल्मट शिमट्झ यांच्या सरकारात सहभागी होते. मात्र पर्यावरणवाद्यांच्या पक्षास इतकी मोठी सत्तासंधी प्रथमच. त्या पक्षाचे रॉबर्ट हेबेक आणि ॲनालेना बबॉक हे अनुक्रमे उपाध्यक्ष आणि परराष्ट्रमंत्री बनतील. अर्थमंत्रालय लोकशाहीवादी पक्षाचे ख्रिश्चियन लिंडनर यांच्याकडे असेल. या वैचारिक मध्यबिंदूच्या डावीकडील पक्षांकडे इतकी सत्तापदी गेल्याने जर्मनी डावीकडे झुकणार की काय, अशी शंका युरोपीय वर्तुळात व्यक्त होत होती. ती शोल्झ यांनीच खोडून काढली. 'डावीकडे नव्हे, तर पुढे जाणे हे आमच्या सरकारचे ध्येय असेल,' असे ते म्हणाले, ही महत्त्वाची बाब अशासाठी की युरोपातील दुसरी अर्थव्यवस्था असलेल्या फ्रान्सचे अध्यक्षपद समाजवाद्यांकडे असताना पहिली मोठी अर्थसत्ता असलेल्या जर्मनीतही अशाच विचारांचे सरकार यावे हा मोठा सुखद आणि सूचक योगायोग. सुखद अशासाठी की मध्यंतरी कर्कश आणि कर्मठ उजव्यांचे राजकारण लोकप्रिय होते की काय अशी रास्त चिंता सर्वत्र व्यक्त होत होती. विशेषत: अमेरिकेच्या अध्यक्षपदी २०१६ साली डोनाल्ड ट्रम्प निवडले गेल्यानंतर या अशा विचारांस सर्वत्र भरते येताना दिसत होते. ही चूक आधी फ्रान्स आणि नंतर खुद्द अमेरिकेनेच सुधारली. आता जर्मनीने त्यावर शिक्कामोर्तब केले. आणि सुखावह अशासाठी की समलैंगिकता, काही विशिष्ट अमली पदार्थ वापरास रीतसर अनुमती, स्थलांतरित अशा मुद्द्यांवर काही प्रागतिक धोरणे प्रत्यक्षात येतील. मर्केल यांनी त्याची सुरुवात केलेलीच होती. शोल्झ ती पुढे नेऊ शकतील. शिवाय जगात पर्यावरण हा मुद्दा आर्थिक विकासाच्या केंद्रस्थानी येत असताना पर्यावरणवाद्यांच्या पक्षाची सत्तेतील भागीदारी अत्यंत निर्णायक ठरेल. कर्बवायू उत्सर्जन हा सध्या जगातील विकसित आणि विकसनशील देशांतील वादाचा मुद्दा बनलेला आहे. 'तुम्ही भूतकाळात निरंकुश कर्बवायू उत्सर्जन केले म्हणून वसुंधरेच्या भविष्यासाठी ते आम्ही वर्तमानात कमी करावे हे सांगण्यासाठी तुम्हांस हक्क नाही', हे भारतासह अन्य विकसनशील देशांचे विकसित देशांस सांगणे म्हणजे तापमानवाढ नियंत्रणाचा उपाय सर्वांस मान्य. पण कोणी किती प्रमाणात तो अमलात आणायचा यावरून हा वाद. अशा वेळी विकसित देशांचे नेतृत्व करण्याची संधी या आघाडीच्या निमित्ताने जर्मनीस मिळेल. दुभंगलेले युरोप खंड हे या सरकारपुढील आणखी एक आव्हान.

# रुग्णहक्कांच्या जागराची मात्रा

कोव्हिडच्या महासाथीला तोंड देताना खासगी आरोग्य व्यवस्थेवर नियंत्रण आणण्यासाठी महाराष्ट्रातील राज्य सरकार तसेच सार्वजनिक आरोग्य खात्याने रुग्णहिताचे काही निर्णय घेतले. त्यामध्ये प्रामुख्याने खासगी रुग्णालयातील ५० टक्के खाटा ताब्यात घेऊन त्या रुग्णांना उपलब्ध करून देणे; खासगी रुग्णालयांच्या नफेखोरीला आळा घालण्यासाठी उपचारांचे दर निश्चित करणे; सर्व सरकारी आणि खासगी रुग्णालयात रुग्ण हक्क सनद दर्शनी भागात लावण्याचे आदेश देणे, इतकेच नाहीतर सर्व खासगी रुग्णालयांच्या कोव्हिड उपचार बिलांचे ऑडिट करणे या मुद्द्यांचा समावेश होता. 'कोरोना एकल महिला पुनर्वसन समिती' व 'जन आरोग्य अभियान' यांनी खासगी रुग्णालयांनी घेतलेल्या अतिरिक्त बिल आकारणी विरोधात एकल महिलांची 'संताप सभा' घेऊन त्यांच्या तक्रारी राज्य दरबारी मांडल्या. या उपक्रमाला राज्य सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, एकल महिलांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या आधारे खासगी रुग्णालयांच्या बिलांचे ऑडिट करून जास्तीच्या बिलांच्या आकारणीचा परतावा रुग्णांना देण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. राज्य सरकारचे हे पाऊल स्वागतार्ह आहे आणि असे निर्णय घेऊन महाराष्ट्र सरकार इतर राज्यांसाठी आदर्श घालून देत आहे. कारण कोव्हिड महासाथीमुळे आणि लसीकरणादरम्यान देशात रुग्णांच्या हक्कांची मोठ्या प्रमाणात पायमल्ली होत असून, ती गंभीर असल्याचा निर्वाळा 'ऑक्सफॅम इंडिया' या संस्थेच्या सर्वेक्षणाच्या अहवालात देण्यात आला आहे.

फेब्रुवारी ते सप्टेंबर २०२१ या दरम्यान 'ऑक्सफॅम इंडिया'ने दोन ऑनलाइन सर्व्हें घेतले. त्यामध्ये देशामधल्या २८ राज्यांमधील तसेच पाच केंद्रशासित प्रदेशातील १४ हजार ८४५ लोकांनी भाग घेतला. पहिल्या सर्व्हेमध्ये रुग्ण हक्कांसंदर्भातील परिस्थितीबाबत तीन हजार ८९० लोकांकडून तर दुसऱ्या सर्व्हेमध्ये कोव्हिड लसीकरणादरम्यान आलेल्या अनुभवासंदर्भात १० हजार ९५५ लोकांकडून माहिती गोळा करण्यात आली. आपल्या राज्यातील दोन हजार १४५ व्यक्तींनी या सर्व्हेमध्ये सहभाग घेतला. त्यात पहिल्या सर्व्हेमध्ये ६१७ तर दुसऱ्या सर्व्हेमध्ये एक हजार ५२८ लोकांनी आपली मते नोंदवली.

### सनद आणि वस्तुस्थिती

२०१८ मध्ये राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि केंद्र आरोग्य व कुटुंबकल्याण खात्याने प्रत्येक रुग्णाला कोणत्याही सरकारी आणि खासगी दवाखाना/रुग्णालयात भेदभावरहित, सन्मानपूर्वक वागणूक आणि आरोग्यसेवा मिळण्यासाठी 'रुग्ण हक्क सनद' तयार केली आहे. सर्व राज्यांतील प्रत्येक रुग्णालयात ती दर्शनी भागात लावण्याचे सुचवण्यात आले आहे. रुग्ण हक्कांची पायमल्ली रोखणे, त्यावर देखरेख करणे ही जबाबदारी राज्य सरकारांवर देण्यात आली आहे. त्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा उभारण्याचे या सनदेमध्ये सुचवण्यात आले आहे. रुग्ण हक्क सनदेमधील काही महत्त्वाच्या हक्कांबद्दल लोकांचे मत या सर्व्हेमध्ये विचारण्यात आले होते.

### महिला परिचारक नाही

सनदेमध्ये रुग्णाच्या आजाराबद्दल गोपनीयता राखणे हा त्याचा हक्क असल्याचे नमूद करून कोणत्याही रुग्णालयात पुरुष डॉक्टरांनी महिला रुग्णांची तपासणी महिला कर्मचारी-परिचारिकेच्या उपस्थितीत करावी असे म्हटले आहे. या संदर्भात सर्व्हेमध्ये सहभागी महिलांपैकी ३५ टक्के महिलांनी नोंदवले आहे की, पुरुष डॉक्टरकडून त्यांची वैद्यकीय तपासणी होत असताना तिथे महिला परिचारिका उपस्थित नव्हती.

राज्य पातळीवर या संदर्भात सर्वेमध्ये सहभागी महिलांपैकी ३० टक्के महिलांनी त्यांच्या बाबतीत असेच घडल्याचे सांगितले आहे.

### माहिती देत नाहीत

कोणत्याही प्रकारची वैद्यकीय चाचणी करण्याआधी आणि कोणताही औषधोपचार करण्याआधी रुग्णाला, त्याला झालेल्या आजाराची माहिती, त्यामागचे कारण व आजाराचे स्वरूप जाणून घेण्याचा अधिकार आहे असे सनदेमध्ये नमूद करण्यात आले आहे. या हक्काबद्दल ७४ टक्के लोकांनी सांगितले की, उपचारांसाठी रुग्णालयात गेल्यावर त्यांना झालेल्या आजाराची माहिती, त्याचे स्वरूप किंवा कारण असे काहीही न सांगता डॉक्टरांनी फक्त औषधाची चिठ्ठी लिहून दिली अथवा वैद्यकीय तपासण्या करून आणायला सांगितल्या. राज्यात एकूण ७२ टक्के लोकांचा हा अनुभव आहे.

### खर्चाचा अंदाज देत नाहीत

स्वत: किंवा नातेवाईक रुग्णालयात दाखल झाले होते अशा ५८ टक्के लोकांना वैद्यकीय तपासण्या/औषधोपचाराच्या खर्चाचा कोणताही अंदाज रुग्णालयाकडून देण्यात आला नव्हता. राज्यातील ५३ टक्के लोकांनी हा अनुभव आल्याचे सांगितले. तर सर्व्हेत सहभागी झालेल्या सर्व राज्यांमधील ८० टक्के लोकांनी (महाराष्ट्रात ८३ टक्के लोकांनी) हे नमूद केले की, त्यांना रुग्णालयाकडून एका विशिष्ट ठिकाणावरून वैद्यकीय तपासण्या करायला सांगण्यात आले.

सर्व्हेमध्ये सहभागी ५७ टक्के लोकांनी संगितले की केल्या गेलेल्या तपासण्यांची माहिती त्यांना देण्यात आली नाही. महाराष्ट्राच्या बाबतीत हेच प्रमाण ५६ टक्के इतके आहे. एका ठिकाणी उपचार सुरू असलेल्या रुग्णाला किंवा त्याच्या नातेवाईकांना रुग्णाचा आजार अथवा औषधोपचारांबद्दल आणखी माहिती घेण्यासाठी दुसऱ्या डॉक्टरचे मत घेण्याचा अधिकार या सनदेमध्ये नमूद केला आहे. पण या देशभरातील ३३ टक्के लोकांना (महाराष्ट्रात २९ टक्के लोकांना) या हक्कापासून वंचित राहावे लागल्याचे दिसून आले आहे.

### जात-धर्मनिहाय भेदभाव



कोणत्याही रुग्णाला त्याचा धर्म, जात, वंश, लिंग, वय, भाषा आणि भौगोलिक परिस्थिती बघून आरोग्यसेवा दिली अथवा नाकारली जाता कामा नये. पण सर्व्हेमधील एकूण सहभागींपैकी ३३ टक्के मुस्लीम (महाराष्ट्रात हेच प्रमाण १४ टक्के), २२ टक्के आदिवासी, २१ टक्के अनुसूचित जातीतील (महाराष्ट्रमध्ये १२ टक्के व्यक्तींना) व्यक्तींना उपचार घेतेवेळी त्यांच्या धर्म, जातीमुळे भेदभाव सहन करावा लागला असे त्यांनी नमूद केले आहे.

### लसीकरणाचे अनुभव

कोव्हिड लसीकरणाशी संबंधित सर्व्हेमध्ये असे आढळून आले की लोकांना लस घेताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागले. लस उपलब्ध नसल्याचे सतत सांगितले गेल्यामुळे ४३ टक्के लोकांना लस घेता आली नाही. २९ टक्के लोकांना लस घेण्यासाठी सतत जावे लागले अथवा लांब रांगांमध्ये उभे राहावे लागले. २२ टक्के लोकांना ऑनलाइन नोंदणीमध्ये अडचणी आल्या. लसीकरण आणखी सुलभ होण्यासाठी पर्याय विचारले असता, ८३ टक्के लोकांनी कोव्हिड लस मोफत मिळावी असे सुचवले; ८९ टक्के लोकांनी लसीकरण केंद्राची वेळ आणखी वाढवावी असे सुचवले.

८८ टक्के लोकांनी सुचवले की, ओळखपत्राच्या अटीशिवाय लसीकरण केले जावे.

### काही सूचना

या मांडणीतून देश तसेच आणि राज्यामधील रुग्ण हक्कांसंदर्भातील परिस्थिती समोर येते. यावर उपाययोजना करण्यासाठी सरकारने वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करण्याची गरज आहे. वरील निष्कर्ष सरकारी तसेच खासगी आरोग्य यंत्रणेसाठी लागू आहेत. त्यामुळे उपाययोजनांचा विचार करताना काही गोष्टी दोन्ही यंत्रणासाठी लागू कराव्या लागतील. उदा. स्थानिक संस्था-संघटना आणि आरोग्य यंत्रणा यांनी मिळून रुग्ण हक्कांची जनजागृतीची मोहीम लोकांमध्ये राबवणे; रुग्ण हक्क सनद सगळ्या रुग्णालयात दर्शनी भागात लावण्याचे अभियान राबविणे, त्याची अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी लोकाधारित यंत्रणा उभी करणे; आरोग्य हक्कांचा सर्वसमावेशक कायदा आणणे इत्यादी.

महाराष्ट्रात सरकारी आरोग्यसेवेतील रुग्ण हक्कांची व्याप्ती वाढवण्यासाठी सध्या राबवल्या जात असलेल्या लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकियेची अंमलबजावणी सर्व जिल्ह्यांमध्ये करणे; स्थानिक पातळीपासून ते राज्य पातळीपर्यंत सशक्त आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा उभी करणे; सर्वात महत्त्वाचे म्हणजे सध्याची सरकारी आरोग्यसेवा यंत्रणा बळकट करण्यासाठी पुरेशा निधीची तरतूद करणे, रिक्त पदे भरणे, पुरेशा औषधांची उपलब्धता असे धोरणात्मक मुद्दे राज्य सरकारने तडीस लावायला हवेत.

राज्य सरकारने खासगी रुग्णालयांच्या बाबतीत क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट कायदा तातडीने लागू करायला हवा. कोव्हिडच्या दुसऱ्या लाटेनंतर उत्तर प्रदेशने या कायद्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. कोव्हिडकाळात सरकारने खासगी रुग्णालयांवर नियंत्रण आणायच्या दृष्टीने उचललेली पावले कायमस्वरूपी लागू करण्यासाठी निर्णय घ्यावेत.

# एकट्या महिलेला मदतीचा दिलासा




अपघातात तरुण मुलाचा मृत्यू झाल्यानंतर भरपाईसाठी दावा सुरू असताना पतीचेही निधन झाल्याने एकट्या महिलेला लोकअदालतीत दिलासा मिळाला. मुलाच्या अपघाती मृत्यूच्या भरपाईसाठी विमा कंपनीविरोधात केलेल्या दाव्यात संबंधित महिलेला २९ लाख रुपये देण्याचे आदेश देण्यात आले.मोटार अपघात न्यायाधिकरणाचे प्रमुख सदस्य सत्र न्यायाधीश प्रदीप अष्टुरकर, ॲड. अतुल गुंजाळ आणि ॲड. सुरेंद्र दातार यांच्या पॅनेलने हा दावा निकाली काढला. अर्जदार महिलेच्या वतीने ॲड. कांचन धामणकर यांनी आणि विमा कंपनीच्या वतीने ॲड. आर. डी. वाकचौरे यांनी काम पाहिले.

संतोष बाबूराव पाटील असे अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव आहे. संतोष चार डिसेंबर २०१९ रोजी रात्री दहाच्या सुमारास दुचाकीवरून चालला होता. त्या वेळी भैरोबा नाल्याजवळ मागून आलेल्या ट्रकने त्याच्या दुचाकीला धडक दिली. त्यात संतोषचा मृत्यू झाला. त्यानंतर आई लक्ष्मी आणि बडील बाबूराव यांनी डिसेंबर २०१९ मध्ये भरपाईसाठी मोटार अपघात न्यायाधिकरणात दावा दाखल केला. ट्रकची विमा कंपनी असलेल्या 'युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी'च्या विरोधात दावा दाखल करण्यात आला होता. संतोष एका कंपनीत रिलेशन मॅनेजर म्हणून काम करत होता. आई-वडील त्याच्यावर अवलंबून होते, हा विचार करून विमा कंपनीने भरपाई देण्याची दाव्यात करण्यात आली होती. हा दावा सुरू असताना १६ जानेवारी २०२०ला बाबूराव यांचेही निधन झाले. लोकअदालतीत हा दावा निकाली काढण्यासाठी ठेवण्यात आला होता.

# बालेकिल्ल्यात समस्यांचा डोंगर

वागळे इस्टेट हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून मागील निवडणुकीमध्ये येथील मतदारांनी शिवसेनेच्या पारड्यात भरभरून मते टाकल्याने वागळेतील बहुतांश प्रभागामध्ये शिवसेनेने बाजी मारली होती. वागळेमध्ये शिवसेनेचा कायमच दबदबा राहिला असला, तरी येथे आजघडीला अनेक समस्या उभ्या आहेत. धोकादायक, जुन्या, मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये नागरिक जीव मुठीत धरून राहत आहेत. त्यामुळे क्लस्टर योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. दोन वर्षांपूर्वी किसननगरमध्ये या योजनेचा शुभारंभ होऊनही प्रत्यक्षात पुढे काहीच झालेले नाही. योजनेच्या अंमलबजावणीची प्रक्रिया खूपच हळू आहे. ही योजना राबवणार कधी, हा प्रश्न कायम आहे. अत्यंत दाटीवाटीचा भाग असलेल्या वागळेमधील नागरिकांना विविध समस्या भेडसावत आहेत. याच वागळेमधील प्रभाग क्रमांक १८मध्येही समस्या आहेत. मुंबईला लागूनच हा प्रभाग असूनही समस्या 'जैसे थे' आहेत.



**जीर्ण, धोकादायक इमारती**

संपूर्ण वागळे इस्टेटमध्ये धोकादायक तसेच जीर्ण इमारतींचा प्रश्न गंभीर आहे. अनेकदा स्लॅब किंवा इमारतींचे प्लास्टर पडण्याच्या घटना घडत असल्याने हजारो नागरिक जीव मुठीत धरून राहत आहेत. सन २०१७मध्ये नोव्हेंबर महिन्यात किसननगरमधील एका धोकादायक इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील घराचा स्लॅब दुसऱ्या मजल्यावरील घरात कोसळला होता. या दुर्घटनेमध्ये एका ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला. तर, तिघे जखमी झाले होते. अनेक जुन्या इमारती प्रभाग क्रमांक १८मध्येदेखील आहेत. या प्रभागामध्ये अत्यंत दाटीवाटीने इमारती उभ्या आहेत. एखादी दुर्घटना घडल्यास इमारतींपर्यंत अग्निशमन दलाची गाडीदेखील पोहोचत नाही. दोन इमारतींमधील अंतर खूपच कमी असून धोकादायक तसेच मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी क्लस्टर योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ६ फेब्रुवारी २०२० रोजी ठाण्यातील मंजूर क्लस्टर योजनेअंतर्गत किसननगर येथील पहिल्या योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला होता. या योजनेची अंमलबजावणी कधी होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. लवकरात लवकर या योजनेची अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

प्रभाग क्रमांक १८मध्ये ठाणे महापालिकेचे नाना-नानी पार्क आहे. परंतु या पार्कच्या मूळ उद्देशालाच तडा गेला आहे. आयुष्याच्या उतारवयात काही वेळ निवांत घालवता यावा, तसेच गप्पागोष्टी करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक नानी-नानी पार्कमध्ये जातात. मात्र, येथील पार्कची खूपच दुरवस्था झाली असून पार्कची साफसफाई नियमित होत नसल्याचे एकंदरीत परिस्थितीवरून दिसून येते. या पार्कमध्ये कचरा पडलेला दिसतो. शिवाय भंगार दुचाकी ठेवण्यात आल्या आहेत.

# लग्नसोहळ्यासाठी जात असताना कारचा भीषण अपघात; दोन जण गंभीर जखमी



गडचिरोली: मध्यप्रदेश राज्यातील बैतुल येथून गडचिरोली जिल्ह्यात लग्नसोहळयासाठी येणाऱ्या चारचाकी वाहनाचा अपघात झाल्याची घटना सोमवारी रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली आहे. जिल्ह्यातील आष्टी-मुलचेरा मार्गावर या कारचा अपघात झाला आहे. या अपघातात वाहन चालकासह इतर चारजण गंभीर असल्याने त्यांना मुलचेरा ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

आष्टी ते मुलचेरा रस्त्यावर जवळपास १८ किलोमीटरवर अंतरावर असलेल्या वळणावर वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने MP 05 CB 0645 या क्रमांकाचा शॉर्ट बोलेरो गाडीने झाडाला जबर धडक दिली. ही धडक इतकी जबर होती की झाड कोसळून वाहनाने पलटी खाल्ली. अपघाताची माहिती मिळताच मुलचेरा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी प्रशांत जुमडे आणि त्यांच्या चमूने घटनास्थळी धाव घेऊन रुग्णवाहिका बोलावून जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल केले.

बैतुल येथून मुलचेरा तालुक्यात एका लग्नसोहळासाठी पाच मित्र शॉर्ट बोलेरोने येत होते.आष्टी ते मुलचेरा रस्त्यावरील वळणावर वाहनवरील नियंत्रण सुटल्याने सदर अपघात झाला. अपघात इतका भीषण होतं की वाहनाचा धडकेत चक्क झाड कोसळले. पाच पैकी दोन जण गंभीर असून त्यांना मुलचेरा येथील ग्रामीण रग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने चंद्रपूर येथे हलविले आहे.

# मूकबधीर नागरिकांना गंडा घालणाऱ्यांना अटक



गुंतवणूक केल्यानंतर ६० दिवसांमध्ये दुप्पट पैसे देण्याच्या आमिषाने अंध व मूकबधीर नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीला आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. या टोळीने आतापर्यंत ५५७ मूकबधीर नागरिकांची तीन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. सुयोग सुधीर मेहता (वय ३३, रा. रायकरमळा, धायरी), अभिजत सैफउद्दीन घोडनदीवाला (वय ३२, रा. साळुंके विहार), प्रदीप महारूद्र कोलते (वय २९, रा. वाल्हेकरवाडी, चिंचवड) आणि चंचला सुयोग मेहता (वय ३२, रा. रायकरमळा, धायरी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या आरोपींना १४ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंध व मूकबधीर व्यक्तींची गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणूक केल्याच्या आरोपावरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी देहूरोड परिसरातील ४० वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. आरोपी गुंतवणुकीसंदर्भात केलेला व्हिडिओ व पोस्टर दाखवून मूकबधीर नागरिकांना जाळ्यात ओढत होते. त्यासाठी आरोपींनी सुयोग अँड अभि एंटरप्रायझेस नावाची कंपनी स्थापन केली होती. या कंपनीमध्ये फॉरेक्स ट्रेडिंग मार्केटमध्ये पैसे गुंतविल्यास ६० दिवसांमध्ये दुप्पट, तर ९० दिवसांमध्ये तिप्पट परतावा मिळेल, असे आमिष आरोपी दाखवत होते. त्यानुसार तक्रारदार यांनी आठ लाख रुपयांची गुंतवणूक केली होती. त्यांना आरोपींनी कोणत्याही प्रकारचा परतावा दिला नाही; तसेच त्यांची मूळ रक्कमदेखील दिली नाही. तक्रारदार यांच्या प्रमाणेच आरोपींनी इतरांचीही फसवणूक केली होती. या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेकडून तपास सुरू होता. या गुन्ह्यातील आरोपी मेहता राज्याबाहेर पळून गेला होता. अतिरिक्त पोलिस आयुक्त रामनाथ पोकळे, सहायक आयुक्त विजयकुमार पळसुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अमोल काळे यांच्या पथकाने या गुन्ह्यातील आरोपींना अटक केली. त्यांच्याकडे तपास केल्यानंतर आरोपींनी आतापर्यंत ५५७ मूकबधीर नागरिकांना फसविल्याचे समोर आले आहे.

# अजनीच्या पॉश सलूनमध्ये देहव्यापार; दोघींची सुटका



शहरातील उच्चभ्रू वस्तीतील पॉश सलूनमध्ये सुरू असलेल्या देहव्यापाराचा पर्दाफाश करण्यात गुन्हे शाखा पोलिसांना यश आले. ही कारवाई अजनी चौकातील भवानी चेंबर येथील रेडिफाइन व प्रोफेशन फॅमिली सलूनवर करण्यात आली. गुन्हेशाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या पोलिस पथकाने छापा टाकून दोन मुलींची सुटका केली.

आरोपी नवी दशासन चौधरी (रा. जुनी अजनी) याच्या मालकीचे हे सलून आहे. ग्राहकांच्या बॉडी मसाजसोबतच तो या सलूनमध्ये कार्यरत मुलींकडून देहव्यावसाय करून घेत होता. या सलूनमध्ये कुंटणखाना चालतो, याची माहिती सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाला मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी आपल्या पंटरला या सलूनमध्ये पाठविले. सौदा झाल्यानंतर नवीने एका मुलीसोबत खोलीत पाठविले. पंटरने इशारा करताच दबा धरून बसलेल्या पोलिस पथकाने या सलूनमध्ये छापा टाकला. त्यावेळी पंटर आणि मुलगी एका खोलीत आढळले. पोलिसांनी या सलूनमधून दोन मुलींची सुटका केली. याप्रकरणी बजाजनगर पोलिस ठाण्यात पीटा कायद्यान्वये गुन्हा नोंदवून नवी चौधरी यास अटक करण्यात आली. ही कामगिरी पोलिस निरीक्षक कविता इसारकर, उपनिरीक्षक मंगला हरडे, संदीप चंगोले, चेतन, महिला शिपाई रिना जाऊरकर, प्रतिमा यांनी केली.

# गव्याच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू

कोल्हापूर, गव्याचा हल्ल्यात करवीर तालुक्यातील भुयेवाडी येथील तरुण ठार झाला आहे. सौरभ संभाजी खोत (वय २१, रा. भुयेवाडी) असे तरुणाचे नाव आहे. गव्याच्या हल्ल्यात इतर दोघे जण गंभीर जखमी झाल्याची माहिती पुढे आली आहे. प्रल्हाद उर्फ लाला पाटील जखमी झाले आहेत. वनखात्यानेही या घटनेला दुजोरा दिला आहे.  मयत सौरभ हा माजी सरपंच पूजा खोत यांचा तर विद्यमान ग्रामपंचायत सदस्य संभाजी खोत यांचा एकुलता एक मुलगा आहे. गव्याचा वावर गेले तीन दिवस कोल्हापूर शहराच्या परिसरात आहे. गुरुवारी रात्री गवा लक्षतीर्थ वसाहतीत होता, तर काल शुक्रवारी पंचगंगा नदी परिसरात गव्याचा वावर होता. काल गव्याने दिवसभर जामदार क्लब येथील महादेव मंदिराच्या पिछाडीस गवताच्या रानात ठाण मांडले होते. सायंकाळी पाचच्या सुमारास गवा परतला होता. शिवाजी पुलावरून तो वडणगेतील पवार पाणंदकडे गेला होता. त्यामुळे शहरवासीयांनी सुटकेचा निश्वास टाकला होता. गवा पुन्हा नैसर्गिक अधिवासात जावा यासाठी वनखात्यासह वनप्रेमी संघटनेचे सदस्य प्रयत्नशील होते.

# ओटीपी क्रमांक सांगणं महागात पडलं, कशी झाली पावणेपाच लाखांची ऑनलाईन फसवणूक?

नागपूर : आपल्या मोबाईलवर आलेला ओटीपी क्रमांक कुणाशीही शेअर करू नका. असं बँकेकडून वारंवार सांगितलं जातं.

तरीही काही जण तो शेअर करतात आणि त्यांची फसवणूक होते. असाच एक प्रकार उमरेडमध्ये घडला. ओटीपी क्रमांक सांगणं पावणेपाच लाख रुपयांवर घसरलं.

मी बँकेतून अधिकारी बोलतोय बँकेचं क्रेडिट कार्ड बंद करायचंय तर मग तुमच्या मोबाईलवर आलेला ओटीपी सांगा, असा एक फोन आला. या ओटीपी क्रमांकावरून एका खातेदाराची चार लाख 72 हजार 489 रुपयांची फसवणूक करण्यात आली. उमरेडमधील मंगळवारी पेठेत राहणारे प्रवीण लाडेकर यांच्याकडं भारतीय स्टेट बँकेचे क्रेडिट व डेबीट कार्ड आहे. तुमच्या क्रेडिट कार्डवर 27 हजार रुपये बाकी आहेत. तुमचे कार्ड बंद करायचं असेल तर सांगा. मी बँकेतून अधिकारी बोलते. ते बंद करून देतो, अशी बतावणी केली.





ओटीपी क्रमांक दिला नि फसले

प्रवीण यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला आणि ओटीपी क्रमांक दिला. आता तुमचे क्रेडिट कार्ड बंद करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली.

एनओसी तुमच्या पत्त्यावर येईल, असं त्यांना सांगण्यात आलं. फोन बंद होताच प्रवीण यांच्या खात्यातील चार लाख 72 हजार 489 रुपयांची खरेदी करण्यात आली होती. प्रवीण यांना मेसेज येताच ते घाबरले.

बँकेने हात झटकले

भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत चौकशी केली. क्रेडिट कार्डच्या रकमेपोटी 39 हजार रुपये महिन्याला भरावे लागतील, असं त्यांना सांगण्यात आलं. क्रेडिट कार्डसाठी बँकेतून कुणीही फोन केला नव्हता, असं स्पष्ट करण्यात आलं. तसेच कुणीही तुमच्या मोबाईलवर ओटीपी पाठविला नव्हता, असंही सांगण्यात आलं. उमरेड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली.

माहिती तंत्रज्ञानाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आता सायबर क्राईमनं तपास होईल. कदाचित गुन्हेगार सापडेलही. पण, तोपर्यंत झालेला मनस्ताप कधीच भरून निघणार नाही.

# पोलिसाने घेतली तलावात उडी



नागपूर, आईच्या मृत्यूमुळे नैराश्यात गेलेल्या एका तरुणाने तलावात उडी घेतली. सुदैवाने याचवेळी या तलावावर एका आत्महत्येचा पंचनामा सुरू होता. तेथे उपस्थित असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याला हा युवक पाण्यात बुडताना दिसला. त्याने जिवाची पर्वा न करता तलावात उडी घेत या तरुणाचे प्राण वाचविले.

ही घटना रविवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास अंबाझरी तलाव येथे घडली.

हर्ष राजेश मेंढे (२०, मिलिंदनगर, पाचपावली) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. पोलिस कर्मचारी प्रशांत गायधने आणि जलतरणपटू युवक देवीदास जांभुळकर (चंद्रमणीनगर) या दोघांनी हर्षचा जीव वाचविला. हर्ष दहावी नापास असून त्याला बहीण आहे. ती सध्या पुण्याला शिक्षण घेते आहे. त्याचे वडील वाहनचालक आहेत. ४ नोव्हेंबर २०२१ला झालेल्या एका अपघातात त्याच्या आईचा मृत्यू झाला. हा अपघात घडला तेव्हा हर्ष तेथेच होता. आपल्या जन्मदात्रीला अखेरचे श्वास मोजताना त्याने बघितले. या घटनेचा त्याच्या मनावर खोलवर परिणाम झाला. तो नैराश्यात गेला. शनिवारी तो त्याच्या वडिलांसोबत घरी झोपला होता. रात्री उशिरा वडील उठले असता हर्ष घरात नसल्याने त्यांच्या लक्षात आले. त्यांनी शोधाशोध केली. मात्र, तो कुठेही दिसला नाही.

पंचनाम्याने वाचविले प्राण

रविवारी सकाळी ८.५० च्या सुमारास अंबाझरी तलावात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह तरंगत होता. ही माहिती मिळताच अंबाझरीचे पोलिस शिपाई प्रशांत गायधने पंचनाम्यासाठी घटनास्थळी गेले. यावेळी अंबाझरी तलावाच्या पंप हाउसजवळून हर्षने तलावात उडी घेतली. ही बाब गायधनेंच्या लक्षात आली. त्यांनी थेट तलावात उडी घेतली. याचवेळी तलावावर फिरायला आलेला अन्य एक युवक देवीदास जांभुळकर (चंद्रमणीनगर) यानेही पाण्यात उडी घेतली. दोघांनी हर्षला तलावातून बाहेर काढले.

# कैद्यांची मानसिकता बदलण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आवश्यक

## गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील



मुंबई दि. 13 : "सुधारणा आणि पुनर्वसन" असे ब्रीद असलेल्या महाराष्ट्र कारागृह प्रशासनाकडून कारागृहात असलेल्या बंदीजनांचे पुनर्वसन करण्याबरोबरच त्यांची मानसिकता आणि वर्तणूक बदलण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावेत, असे निर्देश गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिले.

महाराष्ट्रातील पाच मध्यवर्ती कारागृह आणि एक सुधारगृह येथील बंद्यांच्या (न्यायाधीन आणि शिक्षाधीन) कल्याण व पुनर्वसनाकरिता दि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पथदर्शी प्रकल्पाचे सादरीकरण गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत झाले. महाराष्ट्र शासन आणि दि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस यांच्यासोबत सामंजस्य करार करण्याच्या प्रस्तावास गृहमंत्री श्री.वळसे-पाटील यांनी यावेळी मान्यता दिली. नागपूर, तळोजा, येरवडा, नाशिक व औरंगाबाद या पाच मध्यवर्ती कारागृहांमध्ये आणि किशोर सुधारालय, नाशिक येथे हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

या सामजस्य करारामुळे बंद्यांना कायदेविषयक सहाय्य, शारीरिक-मानसिक आरोग्य सेवा तसेच कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन त्यांच्यात मूलगामी परिवर्तन घडविण्यास निश्चित मदत होईल, असा विश्वास गृहमंत्री श्री.वळसे-पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

बंदी कारागृहात शिक्षा भोगत असतांना त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक अडचणी भासत असतात. हे लक्षात घेता त्यांच्या कुटुंबियांना शिक्षण, वैद्यकीय मदत तसेच सदस्यांच्या लग्नासाठी कर्जस्वरूपात आर्थिक मदत देण्यासाठी विशेष धोरण तयार करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. यामुळे शिक्षेदरम्यान केलेल्या कामातून त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहास मदत होऊ शकते असेही ते म्हणाले. गृह विभागाने यासंदर्भात पुढाकार घेऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

या बैठकीस अपर मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव आनंद लिमये, प्रधान सचिव संजय सक्सेना, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस चे प्राध्यापक डॉ.विजय राघवन यांसह गृह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# ऑनलाईन मतदार नोंदणीसाठी बोगस कागदपत्रे जोडणाऱ्या 28 जणांविरुध्द भिवंडी आणि बेलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

ठाणे, दि.13 (जिमाका) :- ऑनलाईन मतदार नोंदणीसाठी अर्जासोबत बोगस कागदपत्र जोडल्याचे आढळून आल्याने ठाणे जिल्ह्यातील 137-भिवंडी पूर्व आणि 151-बेलापूर विधानसभा मतदारसंघातील प्रभारी निवडणूक नायब तहसिलदार यांनी संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत.

भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघामध्ये 6 जणांविरुध्द तर बेलापूर विधानसभा मतदारसंघात 22 जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना कदम यांनी कळविली आहे.



1 जानेवारी 2022 या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रमांतर्गत प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जासोबत बनावट कागदपत्रे जोडल्याचे निर्दशनास आल्याने 137-भिवंडी पूर्व मतदारसंघाचे प्रभारी नायब तहसिलदार विठ्ठल गोसावी यांनी भिवंडीच्या शांतीनगर पोलीस ठाण्यात 6 जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. अशाच प्रकारे सीबीडी बेलापूर येथील पोलीस ठाण्यात 22 जणांविरुध्द 151-बेलापूर मतदारसंघाचे प्रभारी नायब तहसिलदार राजश्री पेडणेकर यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भंगार गोळा करणाऱ्या महिलेला तांदळाची पिशवी दिली, नंतर लक्षात आले की...





कोल्हापुरातील एका महिलेनं भंगार गोळा करणाऱ्या महिलेला आपल्याकडील तांदळाची पिशवी दिली. ही पिशवी घेऊन भंगारवाली निघून गेली. पण, या पिशवीत आपण साठवलेले ७० हजार रुपये होते, हे पिशवी देणाऱ्या महिलेच्या लक्षात आलं. तिनं लगेचच भंगारवालीचा शोध सुरू केला. पण ती न सापडल्यामुळे तिने थेट पोलिस ठाणे गाठले.

शनिवार पेठेत रविवारी ही घटना घडली. कालच्या सुट्टीच्या दिवशी या परिसरात काही महिला भंगार गोळा करत होत्या. एका महिलेने त्यांना घरात शिल्लक असलेले तांदूळ देऊ केले. भंगारवाल्यांनी महिलांनी तांदूळ स्वीकारण्यास होकार दिल्यानंतर संबंधित महिलेने भंगार गोळा करणाऱ्या महिलेला तांदळाची पिशवी दिली. तांदूळ घेऊन महिला निघून गेली. दरम्यान, तांदूळ देणाऱ्या महिलेच्या लक्षात आले की आपण साठवलेले ७० हजार रुपये तांदळाच्या पिशवीत आहेत. घाबरलेल्या महिलेने भंगार गोळा करणाऱ्या महिलेचा शोध घेतला पण ती सापडली नाही. अखेर तिने लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे गाठले. तिथे पोलिसांकडे तक्रार केली.

पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली भंगार गोळा करणाऱ्या महिलेचा शोध सुरू झाला.

संबधित महिला सायबर कॉलेज परिसरात राहते अशी माहिती पोलिसांना मिळाली.

# कल्याणमधील हत्याकांड प्रकरणी मोठा खुलासा; मुलानेच केली वडिलांची हत्या





कल्याण : कल्याणच्या चिकनघर परिसरात हाय प्रोफाईल हत्ये प्रकरणी पोलिसांनी मोठा खुलासा केला आहे. मुलानेच घरगुती वादातून वडिलांची हत्या केल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. यावेळी मध्ये येणाऱ्या आईवरही मुलाने प्राणघातक हल्ला केला असून यात आई जखमी झाली आहे. आरोपी जखमी मुलगा लोकेश आणि जखमी आई या दोघांवर मुंबईतील सायन रुग्णालयात उपचार सुरु आहेत. कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी लोकेशच्या विरोधात हत्या आणि हत्येचा प्रयत्न या आरोपाखाली गुन्हा दाखल करत पुढील तपास सुरु केला आहे.

कल्याण पश्चिमेकडील चिकनघर परिसरातील एका हाय प्रोफाईल सोसायटीलतील एका फ्लॅटमध्ये रविवारी एका वयोवृद्ध इसमाचा मृतदेह आणि पत्नी व मुलगा जखमी अवस्थेत आढळले होते. याप्रकरणी पोलिसांनी जखमी मुलाकडे चौकशी केली असता त्याने वडिलांनी आपल्यावर व आईवर हल्ला करुन स्वतः आत्महत्या केल्याचे पोलिसांना सांगितले होते. पोलिसांनी अधिक तपास केला असता वेगळेच सत्य समोर आले. घरगुती वादातून मुलानेच केला आई-वडिलांवर हल्ला मयत प्रमोद बनोरिया यांचे आपल्या 27 वर्षीय मुलगा लोकेश याच्याशी सतत वाद होत होते. लोकेश हा सध्या शिक्षण घेत आहे. शनिवारी रात्रीही नेहमीप्रमाणे दोघांमध्ये वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की लोकेशने रागाच्या भरात वडिलांवर धारदार चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात प्रमोद यांचा जागीच मृत्यू झाला. यावेळी आपल्या पतीला वाचवण्यासाठी मध्ये आलेल्या आईवरही लोकेशने 8 ते 10 वार केले. यात लोकेशची आई कुसुम या जखमी झाल्या आहेत. यानंतर स्वतःच्या बचावासाठी त्याने स्वतःच्या पोटावर वार करून घेतले. तसेच आपल्या विरोधात पोलिसांना माहिती दिल्यास जीवे मारण्याची धमकी त्याने आईला दिली होती. रात्रभर जखमी आईसह वडिलांचा मृतदेह घरात ठेवत पहाटेच्या सुमारास सोसायटीच्या सुरक्षा रक्षकाला फोन करून रुग्णवाहिका बोलवण्यास सांगितले. मात्र रात्री उशिरा त्यांच्या घरातून भांडणाचे आवाज येत असल्याने सुरक्षा रक्षकाला संशय आला. त्याने सोसायटीच्या सदस्यांना याची माहिती दिली. सोसायटीमधील लोकांनी घरात येऊन पाहिले असता त्यांना घरातील सदस्य रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले. त्यांनी तात्काळ पोलिसांना याची माहिती दिली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898